NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020
YEAR : 45) 1st August 2020 ( No. of Pages 12 ) ( No : 07

# ''बंधनकारक मार्गदर्शक सूचना'' या नावाचा कोणताही ''उपविधान प्रकार'' विद्यापीठ अनुदान आयोग कायद्यात उपलब्ध नाही

- प्रा.बी.टी.देशमुख
*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

भारतातील उच्च शिक्षणाचे नियमन करणारी, घटनेतील तरतुदीनुसार विधिनियमाने स्थापन झालेली, शीर्षस्थ संस्था या नात्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने मार्गदर्शक सूचना (Guidelines) निर्गमित करणे ही एक सामान्य बाब मानली तरी **खरा प्रश्न "बंधनकारक स्वरूपाच्या मार्गदर्शक सूचना" असा उपविधान प्रकार विद्यापीठ अनुदान आयोगाची निर्मिती करण्याच्या प्रयोजनार्थ केलेल्या विधिनियमाने या आयोगाला पितृसंस्थेने उपलब्ध करून दिला आहे काय? हा आहे.** या प्रश्नाचे उत्तर बंधनकारक "रेग्युलेशन्स" (Mandatory Regulations) हा एवढा एकच उपविधान प्रकार (Form of Subordinate Legislation) १९५६ च्या विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याने, विद्यापीठ अनुदान आयोगाला उपलब्ध करून दिला आहे. **"बंधनकारक मार्गदर्शक सूचना" (Guidelines) या नावाचा कोणताही उपविधान प्रकार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्यामध्ये उपलब्ध नाही.**

**२.** विद्यापीठ परीक्षा संचालनाच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ६ जुलै २०२० रोजी काही मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी मुंबई येथे पत्रकार परिषदा घेऊन "विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या सूचना विद्यापीठांसाठी बंधनकारक आहेत...... एखाद्या राज्यशासनाला विश्वासात घेणे हे आयोगाच्या कक्षेत येत नाही" अशा प्रकारचे विचार जाहीरपणे मांडलेले आहेत. **मार्गदर्शक सूचना ह्या बंधनकारक आहेत या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या भूमिकेमुळे उच्च शिक्षण क्षेत्राला जबरदस्त धक्का बसलेला आहे.**

**३.** केंद्र आणि राज्यशासनामध्ये राज्यकारभार या विषयावरून संघर्ष होऊ नये म्हणून घटनाकारांनी कोणते विषय कोणी हाताळावे याबाबतची काटेकोर आखणी करून दिलेली आहे. भारतीय संविधानाच्या सातव्या परिशिष्टामध्ये अशा विषयांच्या तीन याद्या दिलेल्या आहेत. **(A) पहिली यादी म्हणजे संघ सूची (Union List)** : या यादीमध्ये ६६ व्या क्रमांकावर पुढील विषय आहे :- "Co-ordination and determination of standards in institutions for higher education or research and scientific and technical institutions." **(B) राज्य सूची (State List)** : राज्यशासनांनी हाताळावयाच्या विषयांची एक तपशीलवार यादी या दुसऱ्या सूचीमध्ये दिली असून घटना अंमलात आली त्यावेळी ११ व्या क्रमांकावर पुढील विषय होता :- "Education, including technical education, medical education and universities," मुळात हा विषय राज्यसूचीमध्ये होता हे खरे असले तरी १९७७ मध्ये घटनादुरूस्तीच्या माध्यमातून तो विषय राज्यसूचीतून वगळण्यात आला व समवर्ती सूचीमध्ये टाकण्यात आला. **(C) समवर्ती सूची (Concurrent List)** : सातव्या परिशिष्टामध्ये देण्यात आलेली ही तिसरी यादी असून मुळात राज्यसूचीमध्ये ११ व्या क्रमांकावर असलेला उपरोक्त विषय आता (१९७७ पासून) समवर्ती सूचीमध्ये क्रमांक २५ वर समाविष्ट (दाखल) करण्यात आलेला आहे.

**४.** केंद्रशासनातील तत्कालीन शिक्षणमंत्री मा. श्री. मौलाना अबुल कलाम आझाद यांनी आयोगाची स्थापना करण्यासाठी जे विधेयक संसदेमध्ये मांडले त्याच्या "उद्देश व कारणाबाबतचे निवेदन" दिनांक २४ सप्टेंबर १९५४ रोजी सभागृहात सादर केले. त्यातील महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणे :- "The Constitution of India vests Parliament with **exclusive authority in regard to coordination and determination of the standard in institution for higher education** or research and scientific and technical institutions. It is obvious that neither coordination nor determination of standards is possible unless the central government has some voice in the determination of standards of teaching and examination in universities, both old and new." सर्व प्रक्रिया पूर्ण करून १९५६ चा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम मार्च १९५६ मध्ये अस्तित्वात आला. त्याचे दीर्घ शीर्षक पुढीलप्रमाणे आहे :- "An Act to make provision for the co-ordination and determination of standards in Universities and for that purpose, to establish a University Grants Commission."

### उपविधानाची व्यवस्था

**५.** विशिष्ट उद्दिष्ट पूर्तीसाठी कायदेमंडळ ज्यावेळेला एखादा कायदा करण्याची प्रक्रिया हाती घेते, त्यावेळेला ढोबळमानाने प्रमुख तरतुदींचा समावेश विधेयकाच्या मसुद्यामध्ये असतो. मात्र सर्व बारीक-सारीक तपशील विधेयकात समाविष्ट करणे हे शक्य होत नसल्यामुळे किंवा विधानमंडळाजवळ तेवढा वेळ नसल्यामुळे उपविधान (Subordinate Legislation) या नावाची व्यवस्था अस्तित्वात आणल्या जाते. विद्यापीठांचे वेगवेगळे कायदे पाहिले तर त्यामध्ये Statutes, Ordinances, Rules & Regulations या प्रकारांचे उपविधान समाविष्ट असते. प्रत्येक प्रकार हा कोणत्या विषयांच्या बाबतीत लागू पडेल व उपविधानाचा तो प्रकार अस्तित्वात आणावयाचा असेल तर त्याबाबतची कार्यरिती कशी असेल? याबाबतचे सारे तपशील कायद्यामध्ये समाविष्ट असतात. **विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्याचा विचार केला तर Rules आणि Regulations या दोनच प्रकारचे उपविधान या कायद्यामध्ये नमूद केलेले आहेत. त्यातही आयोगाला फक्त Regulations एवढा एकच उपविधान प्रकार उपलब्ध आहे.**

### RULE MAKING

**६.** ढोबळमानाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सदस्यांचे सेवानिवृत्तीचे वय, त्यांची पात्रता-अपात्रता, त्यांच्या सेवाशर्ती, आयोगाच्या कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती या व यासारख्या बाबी नियमांनी (Rules) ठरवावयाच्या असतात. १९५६ च्या विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याच्या खंड २५ मध्ये नियम (Rules) तयार करण्याविषयीच्या तरतुदींचा समावेश आहे व हे नियम तयार करण्याचा अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगाला देण्यात आलेला नसून तो केंद्रशासनाकडेच ठेवलेला आहे. त्यामुळे याबाबतीत फार तपशीलवार चर्चा करण्याची आवश्यकता नाही.

### RECOMMENDATORY REGULATION

**७.** रेग्युलेशन्स हा उपविधानाचा प्रकार विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याच्या खंड २६ अन्वये आयोगाला बहाल करण्यात आलेला आहे. हे रेग्युलेशन्स त्या कायद्याने ठरवून दिलेल्या पद्धतीने केल्यास त्याला कायद्याचे स्वरूप असते. खरे म्हणजे कायद्यात Recommendatory Regulations व Manadatory Regulations अशा प्रकारचा उल्लेख कोठेही नाही. परंतु काही बाबतीत रेग्युलेशन्स निर्गमित करीत असतांना यथोचित अधिकाराचा वापर आयोगाने न केल्यामुळे Recommendatory Regulations हा प्रकार त्यावेळी विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्यावर लादून घेतलेला आहे. देशभर विद्यापीठात किंवा महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून सेवेत येणाऱ्या व्यक्तीची पात्रता काय असावी? हे ठरविण्याचा अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगाला कायद्याने दिलेला आहे. मात्र असे करतांना ढोबळमानाने म्हणजेच सर्वसाधारणपणे (Ordinarily) ही पात्रता काय असावी? व अपरिहार्यपणे म्हणजे सक्तीने अंमलात आणावयाची पात्रता काय असावी? याबाबत शक्तीप्रदान करणाऱ्या तरतुदी वेगवेगळ्या आहेत. कायद्याच्या खंड २६ च्या उपखंड (1) मधील परिच्छेद (e) मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

"(e) defining the qualifications that should **ordinarily be**

***खरा प्रश्न ''बंधनकारक स्वरूपाच्या मार्गदर्शक सूचना'' असा उपविधान प्रकार विद्यापीठ अनुदान आयोगाची निर्मिती करण्याच्या प्रयोजनार्थ केलेल्या विधिनियमाने या आयोगाला पितृसंस्थेने उपलब्ध करून दिला आहे काय? हा आहे.***

*(परिच्छेद १ पहा)*

**required** of any person to be appointed to the teaching staff of the University, having regard to the branch of education in which he is expected to give instruction;"

**८.** उपरोक्त तरतूद काळजीपूर्वक वाचली तर असे लक्षात येईल की, ढोबळमानाने किंवा सर्वसाधारणपणे पात्रता (अपरिहार्यपणे नव्हे) काय असावी हे ठरविण्याचा हा अधिकार आहे. १९९१ मध्ये शिक्षक म्हणून सेवेत भरती होत असतांना नेट-सेटची पात्रता धारण केली असली पाहिजे असे रेग्युलेशन्स विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केले. त्या रेग्युलेशन्सची सुरुवातच पुढीलप्रमाणे होती. :-

"In exercise of the powers conferred by **clause (e) of Sub section (1) of section 26** read with section 14 of University Grants Commission Act, 1956 (3 of 1956) ..... the University Grants Commission hereby makes the following regulations"

**९.** आपण काढलेले नेट-सेटचे १९९१ चे हे रेग्युलेशन्स सक्तीचे नाही याची जाणीव विद्यापीठ अनुदान आयोगाला होती. याचे कारण त्यांनी कायद्यातील कलम 26(1)(e) चा वापर करून ते रेग्युलेशन्स निर्गमित केलेले होते. या गोष्टीची पूर्ण कल्पना असल्यामुळेच त्यावेळचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष प्रा.जी.राम रेड्डी यांनी दिनांक ३ जून १९९२ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन शिक्षणमंत्री श्री.अनंतराव थोपटे यांना एक पत्र ( D.O.No. F.4-12/90 (NET) लिहून पुढीलप्रमाणे विनंती केली होती:-

"The universities must be **persuaded and urged** by the State Government to amend their statutes forthwith requiring appointment of Lecturers through interview only out of the candidates who have passed UGC or State-NET."

**१०.** आपले रेग्युलेशन्स हे जर सक्तीचे आहे याची खात्री असेल तर अशा प्रकारची विनंती विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी राज्याच्या शिक्षणमंत्र्यांना करण्याचे कोणतेही कारण नव्हते. १९९१ चे रेग्युलेशन्स शिफारशींच्या स्वरूपाचे असल्यामुळे देशभर त्यातून फार मोठा गोंधळ निर्माण झाला. परिनियमांच्या द्वारे, स्टॅंडर्ड कोडच्या द्वारे किंवा कुलगुरुंच्या निदेशाद्वारे या पैकी कोणत्याही प्रकारे महाराष्ट्रामध्ये नेट-सेटची पात्रता सक्तीची अट म्हणून १९९१ ते २००० या काळात कधीही अंमलात आणल्या गेली नव्हती.

**११.** ही पात्रता सक्तीची आहे की नाही याबाबतचा वाद देशभर उपस्थित झाल्यानंतर हे प्रकरण अंतिमतः सर्वोच्च न्यायालयामध्ये दिल्ली विद्यापीठ विरुद्ध राज सिंग (AIR 1995 Supreme Court 336) या प्रकरणामध्ये निकाली निघाले. सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला त्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे असे नमूद केले होते की,

(१) कायद्याच्या खंड २६ च्या उपखंड (1) च्या परिच्छेद (e) मधील तरतुदींचा वापर करून हे रेग्युलेशन्स निर्गमित करण्यात आलेले असल्यामुळे ढोबळमानाने किंवा सर्वसाधारणपणे (Ordinarily) पात्रता काय असावी? हे त्यामध्ये नमूद केलेले आहे.

(२) या परिनियमाच्या परिच्छेद २ मध्ये पात्रता शिथिल करण्याचा अधिकार विद्यापीठांना देण्यात आलेला आहे. **त्यामुळे हे रेग्युलेशन्स शिफारशींच्या स्वरुपाचे आहे.**

(३) विद्यापीठाच्या याबाबतच्या स्वायत्ततेवर कोणताही आघात झालेला नाही. नेट-सेटची पात्रता नसलेल्या व्यक्तिंना सेवेत घेण्याचा विद्यापीठाचा अधिकार अबाधित आहे.

(४) नेट-सेटच्या पात्रतेबाबतचे हे रेग्युलेशन शिफारशीच्या स्वरूपाचे आहे. त्याची पूर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणी करता येणार नाही.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील याबाबतचा मजकूर शब्दशः पुढीलप्रमाणेः-

**"21. We now turn to analyse the said Regulations, .....**The first proviso to Cl.2 permits relaxation in the prescribed qualifications by a University provided it is made with the prior approval of the U.G.C. **This is because the said Regulations, made under the provisions of S. 26(1) (e), define the qualifications that are ordinarily and not invariably required of a lecturer..... The provisions of clause 2 of the said Regulations are, therefore, recommendatory in character.....** Yet again, it would be open to the University not to comply with the provisions of clause 2, in which case, in the event that it failed to satisfy the U.G.C. that it had 'done so for good cause, it would lose its grant from the U.G.C..... There is, therefore, no element of selection in the process. The University's autonomy is not entrenched' upon by the said Regulations." **(AIR 1995 Supreme Court 336)**

**१२.** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयानंतर नेट-सेटची पात्रता अपरिहार्य ठरविणारे रेग्युलेशन निर्गमित करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाला जवळ जवळ ६ वर्षांचा काळ लागला. त्यानंतर आयोगाने एप्रिल २००० मध्ये नेट-सेट पात्रता सक्तीचे करणारे रेग्युलेशन्स निर्गमित केले. सुरुवातीलाच कायद्यातील कोणत्या तरतुदींचा वापर करून हे रेग्युलेशन्स करण्यात आलेले आहेत याबाबतचा उल्लेख त्यात पुढीलप्रमाणे आहे. :-

"In exercise of the powers conferred by **clause (e) & (g) of sub-section (1) of Section 26** read with Section 14 of University Grants Commission Act, 1956 (3 of 1956), ..... the University Grants Commission hereby makes the following regulations"

कायद्यातील योग्य तरतुदींचा वापर करून सन २००० मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट-सेटची पात्रता सक्तीची करणारे जे रेग्युलेशन्स निर्गमित केले त्याबाबत पुढे फारसा वाद झाला नाही. काही लोक उच्च न्यायालयात गेले, सर्वोच्च न्यायालयात गेले पण त्याठिकाणी अपयश त्यांच्या पदरी पडले. योग्य तरतुदींचा वापर करून रेग्युलेशन्स काढण्यात आलेले असल्यामुळे सन २००० पासून पुढे ते रेग्युलेशन सक्तीने अंमलात आले.

### MANDATORY REGULATIONS

**१३.** मी सुरुवातीलाच नमूद केलेले आहे की, कायद्यामध्ये Recommendatory Regulations व Manadatory Regulations अशी काही व्यवस्था नाही. Regulations अशीच शब्दरचना आहे. सर्व रेग्युलेशन्स हे कायद्यातील यथोचित तरतुदींचा वापर करून निर्गमित केलेले असतील तर ते बंधनकारकच असतात. सन १९९१ चे रेग्युलेशन हे आयोगाने, सकारण म्हणा किंवा अकारण म्हणा, शिफारशीच्या स्वरूपाचे काढले होते, हा अपवाद म्हणता येईल. रेग्युलेशन्स करण्याचा हा अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगाला कायद्याने दिलेला आहे. त्याबाबतीत कोणकोणत्या विषयावर रेग्युलेशन्स करता येतील याचे तपशील कायद्याच्या खंड २६ मध्ये नमूद करण्यात आलेले आहेत व त्याची कार्यरिती सुद्धा कायद्याने नमूद करून दिलेली आहे. त्या कार्यरितीची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याच्या खंड २६ मध्ये सांगितलेल्या रितीप्रमाणेच रेग्युलेशन्स करता येतील.

(२) काढण्यात आलेले प्रत्येक रेग्युलेशन्स हे गॅझेट ऑफ इंडियामध्ये प्रकाशित करावे लागेल.

***विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्याचा विचार केला तर Rules आणि Regulations या दोनच प्रकारचे उपविधान या कायद्यामध्ये नमूद केलेले आहेत. त्यातही आयोगाला फक्त Regulations एवढा एकच उपविधान प्रकार उपलब्ध आहे.***

*(परिच्छेद ५ पहा)*

**आपल्या परिनियमात, नियमात किंवा उपनियमात रेग्युलेशन्सशी विसंगत अशा काही तरतुदी असतील तर त्या सुसंगत करण्यासाठी सुधारणा करण्याचे कायदेशीर कर्तव्य पार पाडण्याचे बाजूला ठेऊन अनेक विसंगत तरतुदी जन्माला घालण्याचा प्रचंड कुटीरोद्योग महाराष्ट्रातील सर्वच कुलगुरूंनी त्यावेळी हाती घेतला होता.**

*(परिच्छेद १८ पहा)*

(३) अशा प्रकारचे प्रत्येक रेग्युलेशन्स हे निर्गमित केल्यानंतर तातडीने संसदेच्या दोनही सभागृहांसमोर सादर करावे लागतील.

**१४. एका बाजूला भारताच्या घटनेतील तरतुदीनुसार केंद्रशासनाच्या राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या खऱ्याखुऱ्या बंधनकारक रेग्युलेशन्सची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या श्रेष्ठीमध्ये अजिबात उत्साह दिसून येत नाही. त्याबाबतीत त्यांच्या कडून अत्यंत निरुत्साही असा प्रतिसाद दिला जातो. तर याच्या उलट दिनांक ६ जुलै २०२० रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना (Guidelines) ह्या बंधनकारक असल्याचा विशेष प्रचार अतिशय उत्साहाने विद्यापीठ अनुदान आयोगाने चालविलेला आहे.** खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष महाराष्ट्रात पत्रकार परिषदा घेऊन या गोष्टीचा प्रचार करीत आहेत. हे मी उदाहरणासह नमूद करू इच्छितो.

**१५.** विद्यापीठ अनुदान आयोगाने १८ जुलै २०१८ च्या भारत शासन राजपत्राच्या भाग ३, सेक्शन ४ मध्ये प्रकाशित केलेल्या रेग्युलेशन्सचे लघुशीर्षक पुढीलप्रमाणे आहे :-

"1.1 These Regulations may be called the University Grants Commission (Minimum Qualifications for Appointment of Teachers and other Academic Staff in Universities and Colleges and **other Measures for the Maintenance of Standards in Higher Education) Regulations, 2018."**

**१६.** हे रेग्युलेशन्स कोणाला लागू पडतील याविषयीचा स्पष्ट उल्लेख या रेग्युलेशन्सच्या परिच्छेद १.२ मध्ये नमूद आहे तो पुढील शब्दात :-

"1.2 These shall apply **to every University established** or incorporated by or under a Central Act, Provincial Act or a State Act, every Institution including a Constituent or an **affiliated College recognized by the Commission,** in consultation with the University concerned under Clause (i) of Section 2 of the University Grants Commission Act, 1956 and every Institution deemed to be a University under Section 3 of the said Act."

**१७.** सन २०१० च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनसमध्ये अशी स्पष्ट तरतुद होती की, राज्याच्या कायद्यामध्ये, विद्यापीठाच्या परिनियमामध्ये किंवा याबाबतचे नियंत्रण करणाऱ्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये सहा महिन्याच्या आत रेग्युलेशन्सशी विसंगत असलेल्या बाबतीत सुधारणा करून त्या विसंगती संपुष्टात आणाव्या लागतील. सन २०१८ च्या रेग्युलेशन्समध्ये सुद्धा तशीच तरतूद समाविष्ट करण्यात आलेली आहे. रेग्युलेशन्सच्या सहपत्रातील याबाबतचा परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :-

"1.2 Every university or institution deemed to be University, as the case may be, shall as soon as may be, but not later than within six months of the coming into force of these Regulations, take effective steps for the amendment of the statutes, ordinances **or other statutory provisions governing it,** so as to bring the same in accordance with these Regulations."

**१८. आपल्या परिनियमात, नियमात किंवा उपनियमात रेग्युलेशन्सशी विसंगत अशा काही तरतुदी असतील तर त्या सुसंगत करण्यासाठी सुधारणा करण्याचे कायदेशीर कर्तव्य पार पाडण्याचे बाजूला ठेऊन अनेक विसंगत तरतुदी जन्माला घालण्याचा प्रचंड कुटीरोद्योग महाराष्ट्रातील सर्वच कुलगुरूंनी त्यावेळी हाती घेतला होता.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सन २०१८ च्या उपरोक्त रेग्युलेशन्सची महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांच्या मा. कुलगुरूंनी त्यांच्या क्षेत्रामध्ये जबरदस्त मोडतोड केलेली होती व अशी मोडतोड करून आपआपल्या क्षेत्रामध्ये विद्यापीठ कायद्याने दिलेल्या अधिकारांचा वापर करून निदेश पारित केले होते.

**१९.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ही बाब विद्यापीठ अनुदान आयोगाच्या लक्षात आणून देण्याचे ठरविले. दिनांक २२ जुलै २०१९ रोजी राज्यातील दोन ते तीन हजार शिक्षकांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली व विद्यापीठ अनुदान आयोगाला याबद्दल आपले निवेदन सादर केले. या निवदेनाची प्रत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांना बराच अगोदर ॲडव्हान्स कॉपी म्हणून सादर करण्यात आली होती. पुरेशी अगोदर धरणे आंदोलनाची पूर्वसूचना देऊनसुद्धा त्या दिवशी विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष हे दोघेही त्यांच्या पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे कार्यालयामध्ये उपस्थित नव्हते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सचिवांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे निवेदन स्वीकारले व महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाशी चर्चा केली. त्याच वेळेला त्यांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाला असे सांगितले की, "दिनांक ३० जुलै २०१९ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष आपल्या प्रतिनिधी मंडळाशी चर्चा करणार आहेत. तेव्हा आपण त्या दिवशी उपस्थित रहावे."

**२०.** दिनांक ३० जुलै २०१९ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाची चर्चा झाली. ही चर्चा काय झाली याबाबतचा तपशीलवार वृत्तांत मी स्वतः नमूद करण्यापेक्षा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक २२.०९.२०१९ रोजी संमत केलेल्या ठरावाच्या परिच्छेद ६ मध्ये नमूद आहे. तो परिच्छेद जसाच्या तसा पुढीलप्रमाणे :-

"6. The Chairman, UGC on the given day held a full-fledged meeting with the MFUCTO delegation, when Secretary and other officials of UGC were also present.The delegation elaborately highlighted the distortion of the composite scheme of UGC by the unconstitutional modifications of UGC Regulations by the state government, encroaching on the power of UGC. **The attention of Chairman, UGC was drawn to Vice Chancellors' directives, issued in various universities of Maharashtra subsequent to the GR and were consequentially violative of UGC's mandatory regulations.** The MFUCTO delegation expressed concern at the chaos this would create in co-ordination and maintenance of standards of higher education, which may spread in other states. The delegation requested the UGC Chairman to issue directions to all the Universities in Maharashtra to implement the scheme along with UGC Regulations-2018 in its letter and spirit. The Chairman, UGC expressed his concern at these developments. He further expressed that UGC has limited powers in this respect and that it would seek intervention through the MHRD. But since last three weeks there is no communication from UGC in this regard." (P174NB2019)

**रेग्युलेशनचा भंग करणाऱ्या मा.कुलगुरूंच्या निदेशामध्ये व शासननिर्णयामध्ये मा. संचालक, उच्च शिक्षण हे दुरूस्ती करू शकत नाहीत, हे विद्यापीठ अनुदान आयोगाला ठाऊक असू नये हे आश्चर्यकारक होय.**

*(परिच्छेद २४ पहा)*

**घटनेने व कायद्याने दिलेल्या अधिकारांचा वापर करून जन्मास घातलेल्या बंधनकारक रेग्युलेशन्सची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत पूर्णपणे निरुत्साही असलेले विद्यापीठ अनुदान आयोगाचे ज्येष्ठ पदाधिकारी बंधनकारकतेला कोणत्याही कायदेशीर तरतुदींचा आधार नसलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या बंधनकारकतेची पालखी मात्र मोठ्या डौलाने व वेगाने वाहून नेत आहेत.**

*(परिच्छेद २५ पहा)*

**२१.** आम्ही वारंवार ही गोष्ट विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांच्या लक्षात आणून दिली की, महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांचे कुलगुरू तुमच्या रेग्युलेशन्सची बिनदिक्कत मोडतोड करीत आहेत. तुम्हाला अधिकार असून तुम्ही काहीच कारवाई करीत नाही, ही गोष्ट योग्य नाही. त्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी "एकदम कारवाई करण्याचा विचार मांडण्यापेक्षा तुम्ही महाराष्ट्र शासनातील नेत्यांशी चर्चा करा. कुलगुरूंशी चर्चा करा. आम्ही सुद्धा मानव संसाधन विभागातील मंत्रिमहोदयांशी चर्चा करू." एवढेच आम्हाला सांगितले.

**२२.** महाराष्ट्र शासनात उच्च शिक्षण विभागाचे नेतृत्त्व करणारांशी चर्चा करा हा जो सल्ला विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला दिला त्याबाबत असे नमूद करण्यात येते की, महासंघाने ३० जुलै २०१९ पूर्वी व त्यानंतर असा प्रयत्न वारंवार करून पाहिला, मात्र त्याला प्रतिसाद मिळाला नाही.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्सची अशी मोडतोड महाराष्ट्रामध्ये यापूर्वी कधीही करण्यात आलेली नव्हती. हे मा.उच्च शिक्षण मंत्री श्री. विनोद तावडे यांच्या लक्षात आणून देण्यासाठी सोमवार, **दिनांक १ जुलै २०१९ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे सकाळी १२ ते ४ वाजेपावेतो महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्त्वाखाली राज्यस्तरीय धरणे आंदोलन** आयोजित करण्यात आले होते. पूर्व सूचनेने मा. उच्च शिक्षणमंत्र्यांशी वेळ ठरवून चर्चा करावी. संघटनेचे पदाधिकारी आपले म्हणणे मांडतील असे ठरले होते. शिष्टमंडळाशी चर्चा करण्यास शिक्षणमंत्र्यांना वेळ न मिळाल्यामुळे अशी चर्चा होऊ शकली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्यांची अंमलबजावणी करण्यासाठी जे दोन शासननिर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत ते दोनही शासननिर्णय अत्यंत दोषपूर्ण आहेत अशी टिका महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने आपल्या निवेदनात केलेली होती. त्यामुळे उच्च शिक्षण विभागाला जाग आली. त्या विभागाने दिनांक १४ ऑगस्ट २०१९ रोजी एक शासननिर्णय काढून एका समितीची नेमणूक केली. मा. श्री. विनोद तावडे यांनी फक्त सत्ताधारी पक्षाच्या मांडवात हजेरी लावणाऱ्या शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचेच म्हणणे ऐकून घ्या, इतर कोणाचेही म्हणणे ऐकण्याची गरज नाही; अशी अत्यंत चमत्कारिक व विक्षिप्त भूमिका घेतली व तसे आदेश दिले. या लोकशाही विरोधी व चमत्कारिक भूमिकेतून या शासननिर्णयामध्ये आलेला परिच्छेद २ पुढीलप्रमाणे:-

"२. सदरहू समितीपुढे खालील अध्यापक संघटनांचे प्रतिनिधी त्यांचे म्हणणे विस्तृत स्वरूपात व योग्य समर्थनासह सादर करतील.

डॉ. अनिल कुलकर्णी - अध्यक्ष, शैक्षणिक महासंघ महाराष्ट्र राज्य

डॉ. शेखर चंद्रात्रे - सरचिटणीस, शैक्षणिक महासंघ महाराष्ट्र राज्य

डॉ. कल्पना पांडे - सदस्य, शैक्षणिक महासंघ महाराष्ट्र राज्य"

दोषपूर्ण शासननिर्णयावर म्हणणे ऐकून घेण्यासाठी समिती नेमावयाची व त्या समितीच्या नेमणुकीच्या आदेशातच फक्त सत्ताधारी पक्षाच्या छत्राखाली काम करणाऱ्या शिक्षक संघटनेच्या तीन पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. इतर कोणालाही म्हणणे मांडण्याचीसुद्धा संधी न देणारा शासननिर्णय हा एक चमत्कारच होता. लोकशाही व्यवस्थेमध्ये राज्यकर्त्यांना काय निर्णय घ्यावयाचा असेल तो त्यांनी घ्यावा पण तो निर्णय घेण्यापूर्वी सर्वांचे ऐकून घेण्याचे सुद्धा सौजन्य राज्यकर्त्यांनी दाखवू नये ही बाब विक्षिप्तपणा या सदरात मोडणारी तर आहेच पण लोकशाही व्यवस्थेला निश्चितपणे लाज आणणारी गोष्ट आहे असेच म्हणावे लागेल.

**२३.** विशेष गोष्ट अशी आहे की, ३० जुलै २०१९ नंतर आजपावेतो विद्यापीठ अनुदान आयोगाने या रेग्युलेशन्स बाबत साधे एका ओळीचे पत्र सुद्धा कुलगुरूंना पाठविले नाही. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला सुद्धा याबाबत काही कळविले नाही. अर्थात विद्यापीठ अनुदान आयोगाने कोणालाच कळविले नाही, असे मात्र नाही. तक्रारी साऱ्या देशातून येत असतांना पत्र कोणत्या राज्यामध्ये पाठवावयाचे आणि कोणत्या राज्यामध्ये पाठवावयाचे नाही, तसेच ते केव्हा पाठवावयाचे? याचा निर्णयसुद्धा विद्यापीठ अनुदान आयोग आपल्या आवडी-निवडी प्रमाणे घेत होते असे दिसून येते. पुढील उदाहरण पहा :-

दिनांक ३ सप्टेंबर २०१९ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सचिवांनी मध्यप्रदेश शासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या सचिवांना एक पत्र (मि. संख्या एफ. ९-१९/२०१९ (पीएस/मिस.) पाठवून **"मध्यप्रदेश शासन के द्वारा यूजीसी रेगूलेशन २०१० एवं २०१८ का पालन नहीं किया जा रहा है।"** असे कळविले व पुढे असेही कळविले की, "उपरोक्त विषय में आपसे अनुरोध है कि यूजीसी रेगूलेशन के अनुसार कैरियर एडवांसमेंट स्कीम एवं यूजीसी द्वारा प्रदत अन्य लाभों को प्रदेश के सभी शैक्षिक संस्थानों में कार्यरत शिक्षकों को प्रदान करने हेतु उचित कार्यवाही करने का कष्ट करें।"

**२४.** महाराष्ट्रामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने कोणत्याही विद्यापीठाला पत्र पाठविलेले नाही. मात्र बऱ्याच उशिराने व 'योग्य वेळ' पाहून दिनांक २ जुलै २०२० रोजी श्री.धनराज माने, उच्च शिक्षण संचालक, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांना "Violation of UGC Regulations, 2018 - Reg." या विषयावर एक पत्र पाठवून पुढीलप्रमाणे कळविले. :-

"With reference to your email dated 5th February, 2020 on the subject cited above, I am directed to enclose a copy of representation dated 3rd February, 2020 alongwith UGC Regulation on Minimum Qualifications for Appointment of Teachers & Other Academic Staff in Universities and Colleges and Measures for the Maintenance of Standards in Higher Education, 2018 **which are to be followed mandatorily in** recruitments and promotions." **रेग्युलेशनचा भंग करणाऱ्या मा.कुलगुरूंच्या निदेशामध्ये व शासननिर्णयामध्ये मा. संचालक, उच्च शिक्षण हे दुरूस्ती करू शकत नाहीत, हे विद्यापीठ अनुदान आयोगाला ठाऊक असू नये हे आश्चर्यकारक होय.**

**२५.** सारांश काय तर **घटनेने व कायद्याने दिलेल्या अधिकारांचा वापर करून जन्मास घातलेल्या बंधनकारक रेग्युलेशन्सची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत पूर्णपणे निरुत्साही असलेले विद्यापीठ अनुदान आयोगाचे ज्येष्ठ पदाधिकारी बंधनकारकतेला कोणत्याही कायदेशीर तरतुदींचा आधार नसलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या बंधनकारकतेची पालखी मात्र मोठ्या डौलाने व वेगाने वाहून नेत आहेत.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या उपाध्यक्षांनी मुंबई येथील पत्रकार परिषदेमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने २००३ मध्ये एक रेग्युलेशन्स काढले आहे. त्या रेग्युलेशन्सच्या परिच्छेद ६.१ मुळे आमच्या ६ जुलै २०२० च्या गाईडलाईन्स

**मार्गदर्शक सूचना सल्लास्वरूप आहेत, अशी भूमिका एकदा आयोगाने घेतली असतांना दिनांक २९ एप्रिल २०२० आणि ६ जुलै २०२० या दोन तारखांच्या मधल्या काळात बंधनकारक स्वरूपाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचा अधिकार त्यांना कोठून मिळालेला आहे याबाबतचा उल्लेख ६ जुलै २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये कोठेही दिसून येत नाही.**

*(परिच्छेद २७ पहा)*

***कोरोनाबाधितांच्या संख्येतील हा फरक हरियाणात काम करणाऱ्या कुहाड यांच्या लक्षात आला नाही तर त्यांना दोष देता येणार नाही. साऱ्या देशाचे नेतृत्त्व करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या हे लक्षात येऊ नये हे दुर्दैवीपणाचे तर आहेच पण त्याचबरोबर निर्दयीपणाचे सुद्धा आहे.***

*(लेखाचा परिच्छेद ३० पहा)*

बंधनकारक ठरतात असे नमूद केले आहे. सन २००३ च्या रेग्युलेशनमधील परिच्छेद ६.१ पुढीलप्रमाणे आहे. :-

"The university shall adopt the **guidelines** issued by the UGC and other statutory bodies concerned from time to time in respect of conduct of examinations."

काळजीपूर्वक पाहिले तर येथे सुद्धा "Guidelines" असाच शब्द वापरलेला आहे. "मार्गदर्शक सूचना बंधनकारक आहेत" असा प्रचार आयोगाचे उपाध्यक्ष करीत आहेत. **या मार्गदर्शक सूचना आहेत, तर मग त्या बंधनकारक कशा आहेत? आणि त्या बंधनकारक आहेत तर मग त्यांना मार्गदर्शक सूचना का म्हणायचे.** सारांश काय तर आंग्ल भाषेतील "Guidelines" हा शब्द व मराठी भाषेतील "मार्गदर्शक सूचना" या शब्दांचे अर्थ बदलवून वापरा असा हा प्रस्ताव आहे व तोसुद्धा आयोगाकडून आलेला आहे.

**२६.** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने मांडल्या जात असलेले शब्दांचे खेळ बाजूला ठेवले तरी इथे पुन्हा मुद्दा उपस्थित होतो तो असा की, **"बंधनकारक मार्गदर्शक सूचना" असा उपविधान प्रकार कायद्याने विद्यापीठ अनुदान आयोगाला बहाल केलेला आहे काय? तर या प्रश्नाचे उत्तर स्पष्टपणे "नाही" असे आहे.** कायदेमंडळ आपल्या वैधानिक अधिकारांच्या हस्तांतरणाची प्रक्रिया पार पाडतांना कायद्यापेक्षा कमी दर्जा असलेले उपकायद्याच्या स्वरूपाचे नियम, उपनियम, परिनियम करण्याची शक्ती इतरांकडे सोपवित असते. त्यामुळे या प्रकाराला उपविधान (Subordinate Legislation) असे संबोधले जाते. कायदेमंडळ आपले वैधानिक अधिकार इतरांकडे सोपवित असल्यामुळे याला Delegated Legislation असेही संबोधले जाते. ही बाब इतकी महत्त्वाची समजली जाते की, प्रत्येक विधेयकासोबत **"वैधानिक अधिकार सोपविण्याच्या प्रस्तावाबाबतचे स्पष्टीकरणात्मक निवेदन"** जोडावे लागते. (Memorandum on Delegated Legislation) कोणकोणत्या बाबतीत हे अधिकार सोपविण्यात येत आहेत? ते कोणाकडे सोपविण्यात येत आहेत? ते प्रकार कोणते आहेत? हे प्रस्ताव सामान्य स्वरूपाचे आहेत की, अपवादात्मक स्वरूपाचे आहेत? त्याची माहिती त्या निवेदनामध्ये असणे नियमांनी बंधनकारक केलेले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्यामध्ये Rules व Regulations हे दोनच उपविधान प्रकार नमूद आहेत. "बंधकारक मार्गदर्शक सूचना" या नावाचा उपविधान प्रकार "Memorandum of Delegated Legislation" मध्ये नाही किंवा आजच्या अद्यावत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कायद्यामध्ये सुद्धा नाही.

**२७.** कायदा, नियम, उपनियम करतांना किंवा शासननिर्णय निर्गमित करतांना अशा प्रकारचे उपविधान निर्गमित करण्याचा अधिकार आपल्याला कायद्याच्या कोणत्या कलमान्वये दिला आहे, हे नमूद करण्याची पद्धती आहे. उदाहरण म्हणून द्यायचे झाल्यास

**(a)** विद्यापीठ अनुदान आयोगाने सन २०१८ चे जे रेग्युलेशन्स निर्गमित केलेले आहे, त्याच्या सुरुवातीस पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे:-

"No. F.1-2/2017(EC/PS).—In exercise of the powers conferred **under clause (e) and (g) of sub-section(I) of Section 26 read with Section 14 of the University Grants Commission Act, 1956 (3 of 1956),** .... the University Grants Commission, hereby, frames the following Regulations, namely:-"

**(b)** महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने दिनांक १९ जून २०२० रोजी जो शासननिर्णय निर्गमित केला तो शासननिर्णय निर्गमित करतांना हा अधिकार आपल्याला कोठून मिळालेला आहे, याबाबतचा उल्लेख त्या शासननिर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये करण्यात आलेला आहे. तो पुढीलप्रमाणे:-

"२. प्रस्तुत शासन निर्णय, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये घटीत राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दिनांक १८ जून, २०२० रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे."

**(c)** दिनांक २९ एप्रिल २०२० रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने ज्या मार्गदर्शक सूचना (Guidelines) निर्गमित केलेल्या आहेत, त्यात सुरूवातीलाच पुढीलप्रमाणे उल्लेख आहे :-

"The guidelines are advisory in nature and each university may chart out its own plan of action taking into consideration the issues pertaining to COVID – 19 Pandemic."

**(d)** आपल्या ह्या मार्गदर्शक सूचना सल्लास्वरूपाच्या आहेत असे दिनांक २९ एप्रिल २०२० रोजी कळविणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ६ जुलै २०२० रोजी त्याच विषयावर निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना मात्र बंधनकारक स्वरूपाच्या आहेत असे सांगायला सुरुवात केली.

**मार्गदर्शक सूचना सल्लास्वरूप आहेत, अशी भूमिका एकदा आयोगाने घेतली असतांना दिनांक २९ एप्रिल २०२० आणि ६ जुलै २०२० या दोन तारखांच्या मधल्या काळात बंधनकारक स्वरूपाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचा अधिकार त्यांना कोठून मिळालेला आहे याबाबतचा उल्लेख ६ जुलै २०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये कोठेही दिसून येत नाही.** उपाध्यक्ष मात्र असे सांगत आहेत की, "ह्या मार्गदर्शक सूचना बंधनकारक आहेत."

**२८.** "बंधनकारक मार्गदर्शक सूचना" या स्वनिर्मित उपविधान प्रकाराचा आयोगाने वापर करणे म्हणजे

(१) कायदेमंडळाच्या लक्षात आणून न देता व "Memorandum of Delegated Legislation" मध्ये व कायद्यामध्ये समाविष्ट नसतांना स्वनिर्मित उपविधानाचा प्रकार अनधिकृतपणे जन्मास घालून विद्यापीठ अनुदान आयोग त्याचा वापर करीत आहे असाच त्याचा अर्थ होतो.

(२) रेग्युलेशन्स गॅझेट ऑफ इंडिया मध्ये प्रकाशित करण्याचे जे बंधन आहे ते बंधनसुद्धा विद्यापीठ अनुदान आयोगाचे 'लोकल प्रॉडक्शन' असल्यामुळे "बंधनकारक मार्गदर्शक सूचना" या उपविधान प्रकाराला लागू नसेल, हा एक लाभ आयोगाच्या पदरात पडेल.

(३) औपचारिक उपविधानाचा मसुदा घटनेतील व कायद्यातील तरतुदीनुसार कायदेमंडळासमोर ठेवावा लागतो. स्वयंनिर्मित असा उपविधानाचा 'देशी' प्रकार जन्माला घातल्यामुळे संसदेसमोर त्या उपविधानाचा मसुदा ठेवण्याच्या जबाबदारीतून सुद्धा विद्यापीठ अनुदान आयोगाला अनायसेच मुक्तता मिळते, हा आणखी एक लाभ.

**२९.** खरे म्हणजे यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचना (Guidelines) या संज्ञेच्या वापरामुळे झालेल्या गदारोळाचे एक उदाहरण नमूद करण्यासारखे आहे. खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तत्कालीन उपाध्यक्षांनी शिक्षकांच्या कार्यभाराविषयी Guidelines निर्गमित केल्या होत्या. "The Workload of a teacher shall be ...... in accordance with the guidelines issued by the University Grants Commission from time to time." असे त्यामध्ये नमूद करण्यात आले होते व त्यानंतर मग या मार्गदर्शक सूचनांमध्ये निरनिराळ्या बाबींचे वेगवेगळे तपशील नमूद करण्यात आले होते. असमान स्थितीत सर्व ठिकाणी समान नियम लागू करण्याच्या या प्रयत्नामुळे देशभर एवढा गदारोळ उडाला की, खुद्द विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांना "The breakup of Workload shown is for the sake of

***''बंधनकारक मार्गदर्शक सूचना'' असा उपविधान प्रकार कायद्याने विद्यापीठ अनुदान आयोगाला बहाल केलेला आहे काय? तर या प्रश्नाचे उत्तर स्पष्टपणे ''नाही'' असे आहे.***

*(लेखाचा परिच्छेद २६ पहा)*

example. It is not a rigid breakup" असे पत्र लिहून कळवावे लागले. त्याच पत्रात पुढे त्यांनी असेही नमूद केले होते की, "Suggestions made by the University Grants Commission are not expected to be rigid and have to be considered in the light of work obtained in Universities." खुद्द केंद्रशासनातील शिक्षणमंत्र्यांनी शिक्षणमंत्री या नात्याने एका खासदाराला पत्र लिहून असे अधिकृतपणे कळविले होते की, "The breakup of Workload indicated in the guidelines is only an illustration and is not a rigid formula." केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या या पत्राला व्यापक प्रसिद्धी देण्यात आली होती.

**३०.** सर्व देशभरासाठी एकसारख्या लागू करता येणाऱ्या बाबी बंधनकारक म्हणून रेग्युलेशन्सद्वारा लागू केल्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणची वेगवेगळी स्थिती लक्षात घेऊन ठरवावयाच्या बाबी गाईडलाईन्सच्या माध्यमातून कळविण्याची विद्यापीठ अनुदान आयोगाची फार दिवसापासून चालत आलेली प्रथा आहे. त्याचे मूळ कारण म्हणजे ज्या बाबतीत संपूर्ण देशभर एकसारखी परिस्थिती नसेल तेथे एकसारखे बंधनकारक नियम लागू करणे शक्य होत नाही हे लक्षात घेऊन "मार्गदर्शक सूचनां"चा वापर केला जातो. मग तिथली तिथली परिस्थिती लक्षात घेऊन त्या त्या विद्यापीठांना त्या सूचना अंगिकृत करता येतात.

**(A)** महाविद्यालयाचे शैक्षणिक सत्र कोणत्या महिन्याच्या कोणत्या तारखेला सुरु व्हावे याबाबतीत सर्व देशभर एकसारखे सक्तीचे नियम करणे शक्य होईलच असे नाही. कारण देशाच्या निरनिराळ्या भागांमध्ये त्याबाबतीत वेगवेगळी परिस्थिती असते आणि म्हणूनच त्याबाबतीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे श्रेयस्कर ठरते.

**(B)** खुद्द महाराष्ट्राच्या सर्व भागांमध्ये सुद्धा हवामान आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता शैक्षणिक सत्राची सुरुवात गेली अनेक वर्षे एकाच तारखेला होत नाही. ती वेगवेगळ्या तारखांना होते.

**(C)** महाराष्ट्रामध्ये विशेषतः विदर्भामध्ये उन्हाळा एवढा तापतो की, मे महिन्यामध्ये वर्ग चालविल्या जाऊ शकत नाही व त्यामुळे उन्हाळ्याची सुटी जाहीर करण्याशिवाय दुसरा कुठलाही पर्याय राहत नाही. याच्या उलट परिस्थिती जम्मू आणि काश्मीर या राज्यामध्ये आहे. हिवाळ्यामध्ये इतकी थंडी असते की, तेथे हिवाळ्यात वर्ग चालविल्या जाऊ शकत नाहीत आणि उन्हाळ्यामध्ये सुटी देण्याची गरज राहत नाही. **त्यामुळेच एकसारखी सक्तीची अंमलबजावणी करणारे आदेश याऐवजी मार्गदर्शक सूचना या माध्यमाचा वापर केला जातो.**

**(D)** कोरोनाच्या महामारीने सर्वच राज्यात धुडगुस घातला हे खरे असले तरी सर्व राज्यांमध्ये परिस्थिती सारखी नाही. महामारीने निर्माण झालेल्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने हरियाणातील महेंद्रगड येथे असलेल्या केंद्रीय विद्यापीठाचे कुलगुरू प्रो.आर.सी.कुहाड यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. हरियाणामध्ये आज (२१.०७.२०२०) कोरोना विषाणू बाधीत व्यक्तींची संख्या २६,८५८ असून मृत व्यक्तींची संख्या ३५५ आहे. तर दुर्दैवाने महाराष्ट्रात ती सर्वात जास्त म्हणजे बाधीत व्यक्तींची संख्या ३,१८,६९५ असून मृत व्यक्तींची संख्या १२,०३० आहे. कुहाड यांनी अहवाल दिला त्यावेळी सुद्धा असाच फरक होता. **कोरोनाबाधितांच्या संख्येतील हा फरक हरियाणात काम करणाऱ्या कुहाड यांच्या लक्षात आला नाही तर त्यांना दोष देता येणार नाही. साऱ्या देशाचे नेतृत्त्व करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या हे लक्षात येऊ नये हे दुर्दैवीपणाचे तर आहेच पण त्याचबरोबर निर्दयीपणाचे सुद्धा आहे.**

**३१.** भारताच्या घटनेमध्ये "मार्गदर्शक तत्त्वे" असा शब्द वापरण्यात आलेला आहे. अशा अनेक मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश घटनेच्या चौथ्या प्रकरणामध्ये करण्यात आलेला आहे व घटनाकारांनी कलम ३७ मध्ये असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, "ही मार्गदर्शक तत्त्वे आहेत. बंधनकारक नियम म्हणून यांची न्यायालयातून अंमलबजावणी करवून घेता येणार नाही." सारांश काय तर या तत्त्वांना बंधनकारक करावयाचे असते तर घटनाकारांनी मार्गदर्शक तत्त्वे असा शब्द वापरला नसता. मार्गदर्शक तत्त्वे असा शब्द घटनेत वापरला म्हणून त्या शब्दाचा शब्दकोषीय अर्थ बदलत नाही, हे जेवढे खरे तेवढेच हेही खरे की, २००३ च्या रेग्युलेशन्समध्ये Guidelines असा शब्द वापरण्यात आल्यामुळे Guidelines या शब्दाचा शब्दकोषीय अर्थ बदलत नाही. प्रतिष्ठाप्राप्त अशा इंग्रजी शब्दकोषांमध्ये या शब्दाचा काय अर्थ सांगितला आहे ते पाहू.

(1) "A General rule of Piece of Advice." *(Lexico Oxford and Spanish Dictionary)*

(2) "Official instructions or advice about how to do something." *(Macmillan English Dictionary)*

(3) Informal rules or instructions on how something should be done. *(Longman Dictionary of Contemporary English)*

Guidelines या इंग्रजी शब्दाचा शब्दकोषातील अर्थ बदलवून आपल्या सोयीचा अर्थ लावण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा प्रयत्न आयोगाच्या दर्जाला शोभणारा नाही.

**३२.** शेवटी काय तर या साऱ्या चर्चेतून पुढील निष्कर्ष समोर येतात :-

(१) घटनेच्या सातव्या परिशिष्टातील संघसूचीत ६६ व्या क्रमांकावर असलेल्या विषयाच्या बाबतीत संसदेने विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६ हा कायदा तयार करून विद्यापीठ अनुदान आयोगाला रेग्युलेशन्स निर्गमित करण्याचा अधिकार प्रदान केलेला आहे व त्या कायद्याच्या कलम २६ प्रमाणे आयोगाने निर्गमित केलेले रेग्युलेशन्स हे देशभर बंधनकारक असतात. उपविधानाचा रेग्युलेशन्स हा एकमेव प्रकार विद्यापीठ अनुदान आयोगाला कायद्याने उपलब्ध करून दिलेला आहे. याविषयी कोणताही वाद होऊ शकत नाही.

(२) "बंधनकारक मार्गदर्शक सूचना" या नावाचा कोणताही उपविधान प्रकार विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याने या आयोगाला उपलब्ध करून दिलेला नाही.

(३) Guidelines या इंग्रजी शब्दाचा शब्दकोषातील अर्थ बदलवून आपण म्हणू तोच अर्थ त्या शब्दाला चिकटवला पाहिजे हे म्हणणे उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये टिकणारे नाही.

*****

---

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**
NAGPUR BENCH, NAGPUR

**WRIT PETITION NO.7375 OF 2019**

**Petitioner :** Sunil Pundlikrao Joshi Age 61 years, Occ. Retired Assistant Professor, R/o 85, Pannalal Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati. **VERSUS Respondents : (1)** State of Maharashtra, through its Secretary, Higher & Technical Education Dept., Mantralaya, Extension Building, Mumbai. **(2)** Assistant Director, Higher Education, Amravati Division, V.M.V. Premises, Amravati, Tq. & Dist. Amravati. **(3)** Degree College of Physical Education, through its Principal, Hanuman Vyayam Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati. Shri P.S. Patil, Advocate for the Petitioner Mrs. K.S. Joshi, Additional Public Prosecutor for Respondent Nos.1 & 2

**CORAM : SUNIL B. SHUKRE & S.M. MODAK, JJ.**
**DATE : 9th JULY, 2020.**
**ORAL JUDGMENT :- (Per Sunil B. Shukre, J.)**

Rule. Rule made returnable forthwith. Heard finally by consent.

**2.** The issue involved in this petition, without any dispute, is squarely covered by the view taken by this Court in it's judgment, dated 29/07/2019 delivered in Writ Petition No.2068/2019, which itself was based upon the view taken by another Division Bench of this Court at Main Seat at Mumbai in the judgment, dated 03/10/2018 delivered in Writ Petition No.13166/2017. The view of this Court has been confirmed by the Hon'ble Apex Court when it dismissed the Special Leave Petition filed by the State challenging the said judgment.

**3.** Accordingly, we quash and set aside the communication impugned herein. We direct respondent Nos.1 & 2 to pay pension and other pensionary benefits to the petitioner for the services rendered by him from 01/02/1993 to 31/08/2019 with respondent No.3-College, as per the prevailing rules with all arrears of pensionary and retiral benefits with effect from the date of superannuation, to be paid to the petitioner within three months from the date of the order.

**4.** The writ petition is allowed in the above terms. Rule is made absolute accordingly. No costs.

**5.** This order be communicated to the learned Counsel appearing for the parties, either on the email address or on WhatsApp or by such other mode, as is permissible in law.

(S.M. Modak, J.) (Sunil B. Shukre, J.)

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : CIVIL APPELLATE JURISDICTION**

## WRIT PETITION NO.11746 OF 2018

Mohan Shamrao Shinde Age 61 years, residing at Anand Vidyanagar, Near S.M.High School, Kavathemahankal, Taluka Kavathemahankal. District Sangli ... Petitioner. V/s. **(1)** The State of Maharashtra, Through the Principal Secretary to Government of Maharashtra, Department of Higher & Technical Education, Mantralaya, Annex, Mumbai – 400 032. ... **(2)** Director of Higher Education, Maharashtra State, Pune, Central Building. ... **(3)** Divisional Joint Director, Higher Education (Grants), Kolhapur Division, Rajaram College Campus, Kolhapur ... **(4)** The Senior Auditor, Higher Education (Grants) Kolhapur Region, Kolhapur ... **(5)** The Accountant General (A & E)-1, 101, Maharashi Karve Road, Mumbai – 400 020 ... **(6)** The Principal, Padmabhushan Vasantdada Patil Mahavidyalay, Kavathemahankal, District Sangli 416 405 .... **(7)** The Secretary, Shikshan Prasarak Sanstha, Kavathemahankal, District Sangli 416 405 ... **(8)** The Registrar, Shivaji University, Vidyanagari, Kolhapur District Kolhapur ... Respondents. Mr.C.G.Gavnekar with Mr.G.S.Hiranandani for the Petitioner. Mr.V.M.Mali AGP for the Respondent-State.

## CORAM : S.S. SHINDE & V.G.BISHT, JJ.

**RESERVED ON : 4TH MARCH, 2020 : : PRONOUNCED ON : 16TH JULY, 2020**

**JUDGMENT (PER V.G. BISHT, J.)**

**1.** Heard learned counsel for the parties.

**2.** Rule. Rule made returnable forthwith. Learned counsel waives service on behalf of the respondents. By consent of the parties heard finally at the stage of admission.

**3.** By this petition under Article 226 of the Constitution, the petitioner has approached this Court being aggrieved by the letter dated 5/06/2018 addressed by Respondent No.2 and impugned action of Respondent No.3, whereby it is held that the petitioner is not entitled for pensionary benefits.

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**

NAGPUR BENCH, NAGPUR

**WRIT PETITION NO.7395 OF 2019**

**Petitioner :** Sau. Vibha Ninad Saoji alias Ku. Vibha Laxman Umalkar, Age 60 years, Occ. Retired Assistant Professor, R/o Hedgewar Nagar, Behind Janta College Malkapur, Tq. Malkapur, Dist. Buldhana. **VERSUS Respondents : (1)** State of Maharashtra, through its Secretary, Higher & Technical Education Dept., Mantralaya, Extension Building, Mumbai. **(2)** Assistant Director, Higher Education, Amravati Division, V.M.V. Premises, Amravati, Tq. & Dist. Amravati. **(3)** Malkapur Vidhnyan Mahavidyalaya, through its Principal, Malkapur, Tq. Malkapur, Dist. Buldhana. Shri P.S. Patil, Advocate for the Petitioner Mrs. K.S. Joshi, Additional Public Prosecutor for Respondent Nos.1 & 2

**CORAM : SUNIL B. SHUKRE & S.M. MODAK, JJ.**
**DATE : 9th JULY, 2020.**
**ORAL JUDGMENT :- (Per Sunil B. Shukre, J.)**

Rule. Rule made returnable forthwith. Heard finally by consent.

**2.** The issue involved in this petition, without any dispute, is squarely covered by the view taken by this Court in it's judgment, dated 29/07/2019 delivered in Writ Petition No.2068/2019, which itself was based upon the view taken by another Division Bench of this Court at Main Seat at Mumbai in the judgment, dated 03/10/2018 delivered in Writ Petition No.13166/2017. The view of this Court has been confirmed by the Hon'ble Apex Court when it dismissed the Special Leave Petition filed by the State challenging the said judgment.

**3.** Accordingly, we quash and set aside the communication impugned herein. We direct respondent Nos.1 & 2 to pay pension and other pensionary benefits to the petitioner for the services rendered by him from 04/10/1993 to 30/06/2019 with respondent No.3-College, as per the prevailing rules with all arrears of pensionary and retiral benefits with effect from the date of superannuation, to be paid to the petitioner within three months from the date of the order.

